# संत साहित्याच्या निमित्ताने

— डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८, E mail: marathipradhyapak@gmail.com

महाराष्ट्राच्या जडणघडणीत संतांचा मोठा वाटा आहे. तेराव्या शतकापासून आजपर्यंत महाराष्ट्राला संतांची वाण पडली नाही. महानुभाव पंथ प्रवर्तित करणाऱ्या श्रीचक्रधरांपासून (शके ११०७) ते सतराव्या शतकापर्यंत अनेक वैदिक आणि अवैदिक पंथ आणि संप्रदाय निर्माण झाले. त्यांचे आचार—विचार आणि उद्देश वेगवेगळे होते. या सर्व पंथ आणि संप्रदायांच्या पार्श्वभूमीवर संत चळवळ उभी झाली. संत साहित्य म्हटले की केवळ 'ज्ञानोबा—तुकाराम' या वारकरी संप्रदायाच्या चौकटीत बोटावर मोजण्याइतक्या संतांचे कार्य आणि साहित्य इतकेच अध्ययन करणे म्हणजे समग्र संत साहित्याच्या व्यापकतेवर अन्याय ठरतो. केवळ संतांनीच साहित्य निर्माण केले असे नाही तर त्यांचे काही शिष्य, त्यांच्या संप्रदायातील, पंथातील काही कवी यांनीही साहित्य निर्मिती करून संत साहित्याचा पाया आणि इमारत दोन्हीही मजबूत केल्या आहेत. काहींनी साहित्य निर्मिती केली नाही; परंतु सामाजिक कार्य विपुल केले. त्यांचे गुणवर्णन अन्य कवींनी केले. अशा या संत आणि कवींमध्ये निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांच्यासोबतच बहिणाबाई, चोखामेळा, सावता माळी, गोरा कुंभार, स्वामी विवेकानंद अशा सर्वच कालखंडातील संतांचा विचार करावा लागतो. मग साहित्याची प्रेरणा किंवा पंथीय तत्त्वज्ञान देणाऱ्या संतमहंत आणि कवींनाही त्यातून वगळता येणार नाही. आमित्स्येंद्रनाथ / मच्छिंद्रनाथ, जालंधरनाथ, गोरक्षनाथ / गोरखनाथ, गहिनीनाथ, चांगदेव राऊळ, गोविंदप्रभू, चक्रधर, नागदेवाचार्य, महदायिसा, श्रीपाद श्रीवल्लभ, नृसिंह सरस्वती, सरस्वती गंगाधर उर्फ गंगाधर सरस्वती, जनार्दनस्वामी, माणिकप्रभू, नारायण महाराज जालवणकर, वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंबेस्वामी, अक्कलकोटचे स्वामी, दासोपंत, रामदास, गंगाधर उर्फ रामीरामदास, कल्याणस्वामी, दिनकरस्वामी, वेणाबाई, गिरिधरस्वामी, मेरुस्वामी, भीमस्वामी, आत्माराम महाराज, जयरामस्वामी वडगावकर, रंगनाथस्वामी निगडीकर, केशवस्वामी भागानगरकर, आनंदमूर्ती

ब्रम्हनाळकर, भूवनकीर्ती, ब्रम्हजीनदास, ब्रम्हगुणदास, मल्लीदास, गुणदास, नेमीदास, पंडित मेघराज, कामराज, नागनाथ, सरस्वती गंगाधर, अभयकीर्ती, चिमनापंडित, त्र्यंबकराज, शिवकल्याण, रमावल्लभदास, विष्णुदासनामा, रंगनाथस्वामी निगडीकर, जयरामस्वामी, अवचितसुत काशी, तुका ब्रम्हानंद, भीमस्वामी, उद्धवचिद्धन / उद्धवचिद्घन, मुक्तेश्वर, कचेश्वर ब्रम्हे, निळोबा मकासरे (पिंपळनेरकर), अज्ञानसिद्ध, सिद्धलिंग, नागोजीबाबा, भूजंग, शिवराम, नागेश, भानजीत्रिंबक, अबुदरदा, उस्मान बिन माजून, हासन, इब्राहिम बिन आदम, उजाइल बिन इयाल, शहानवरंग, जंगली फकीर, सय्यद हुसेन, शाह हुसेन फकीर, सय्यद मोहम्मद, शेख सलीम मोहम्मद, रामभक्त लतीफ शाह, अद्वैताचार्य, कृष्णदास कविराज, लोचनदास, दामोदर पंडित, गदाधर पंडित, हरिदास ठाकूर, जगदानंद, मुरारीगुप्त, रामानंदराय, श्रीवास, सनातन गोस्वामी, जीवगोस्वामी, रूपगोस्वामी, श्रीप्रभूदेव, श्रीबसवेश्वर, श्रीचन्नबसवेश्वर, फादर स्टिफन्स पासून गेल्या व या शतकातील तुकडोजी, गाडगेबाबा, गुलाबराव महाराज इत्यादींचाही कुठेतरी विचार होणे आवश्यक ठरते.

स्त्री संतांचे अध्ययन करताना आद्य कवयित्री महदंबा, संत मुक्ताबाई, बहिणाबाई, गोमंतक स्त्री संत सोंसूबाई, आळवार वैष्णवी संत अंडाळ, जनाबाई, शिवशरणी संत अक्कमहादेवी, मीराबाई, सोशिकतेच्या मूर्ती संत सखूबाई, संत सोयराबाई, निर्मळा, योगसाधनांच्या प्रणेत्या संत तरिगोंडा वेंकम्बा, संत कान्होपात्रा, वीरशैव संत कवयित्री भावंडीबाई, निर्भय विठ्ठलभक्त संत भागूबाई, संत बाइयाबाई उर्फ बयाबाई रामदासी, संत प्रेमाबाई, आर्वीच्या संत मायबाई अशा किती संतांची नावे घ्यावी? एखादा लेख किंवा शोधनिबंध लिहिताना मर्यादा पडतात, हे खरेच; परंतु आजही कितीतरी दुर्लक्षित संत आणि संतसाहित्याचे प्रेरणास्थान असलेल्या महान विदूषी कागदावर आणि संदर्भांमध्येही दिसत नाहीत. नवनिर्मिती करीत असताना अभ्यासकांनी हे दुर्लक्षित पैलू संशोधित केले पाहिजेत असे प्रामाणिकपणे नमूद करावेसे वाटते.

संत साहित्याच्या प्रारंभ काळाचा विचार करताना जाणवते की त्या काळात जैन, लिंगायत, महानुभाव आणि अन्य अवैदिक पंथ आपापल्या मतांचा जोराने पुरस्कार करीत होते. पुराणधर्माचे पुनरुज्जीवन करून कर्मकांडाचे महत्त्व पटविले जात होते. बहुजन समाजात व्यभिचारी भक्तीचे हिडीस रूप थैमान घालीत होते. जाखाई, जोखाई यांसारख्या तामसी देवतांचा सुळसुळाट झाला होता. ज्ञानाची द्वारे सर्वसामान्यांना बंद असल्याने समाज दुबळा आणि

दिशाहीन झाला होता. त्यामुळे विकृत विचारांच्या प्रसाराला संधी मिळाली. विविध धर्मपंथ आपले तत्त्वज्ञान बहुजन समाजाच्या गळी उतरवत होते.

तत्कालीन ग्रामे स्थानिक गणराज्याच्या स्वरूपाची होती. गावाचे नियमन गावप्रमुख पाटलाच्या मार्गदर्शनाखाली होत असे. गावाचा महसूल पाहण्याचे काम गावचा कुलकर्णी करीत असे. बलुतेदार—अलुतेदार हा वर्ग समाजाच्या पाठीचा कणा होता. या ग्रामव्यवस्थेत प्रत्यक्ष व्यवहारात ब्राम्हण आणि इतर असे दोनच वर्ण मानले जात. प्रत्येक जातीने आपापली कामे करावयाची, अशी श्रमविभागणीची पद्धत होती. आध्यात्मिक गुरू आणि विधिकर्मे करणारे या नात्याने ब्राम्हणांचे वर्चस्व होते. व्यक्ती समाजाकरिता होती आणि व्यक्तींच्या योगक्षेमाची जबाबदारी समाजावर होती. आर्थिक दृष्टीने गावे स्वयंपूर्ण, संपन्न होती. लोकांचे विश्व मोजके आणि गरजा माफक होत्या. मात्र रूढी, परंपरा, जातिप्रथा यांत समाजव्यवस्था अडकून होती. अशा पार्श्वभूमीवर पुढे संत चळवळ उभी राहिली. या चळवळीतूनच वैविध्यपूर्ण आणि बहुजनसन्मुख साहित्याची निर्मिती होत गेली. बहुतेक संत बहुजन समाजातून आले होते. भारतातील द्रविडी प्रांतातील अळवारादी संत सोडले तर भारतातील आद्यसंतमंडळ म्हणून ज्ञानेश्वर—नामदेव आणि तत्कालीन अन्य संतांचा उल्लेख केला जातो.

महाराष्ट्रातील संत चळवळीचा प्रारंभ यादवांच्या अखेरच्या ऱ्हासकाळात झाला. इ.स.पूर्व २३५ ते इ.स. २२५ या काळात येथे सातवाहनांचे राज्य होते. इ.स. २५० ते ५५० पर्यंत वाकाटकांचे राज्य होते. विदर्भावर त्यांचा विशेष प्रभाव होता. या कालखंडात पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींचे फारसे उल्लेख आढळत नाहीत. पुढे इ.स. ६२० पर्यंत कलचुरींचे राज्य होते. त्यानंतर इ.स. ७५३ पर्यंत बादामी चालुक्यांनी राज्य केले. मात्र दक्षिण महाराष्ट्रात आणि उत्तर कर्नाटकात इ.स. ३४० ते ६६० या काळात कदंबांचे राज्य होते. कदंबांचा गोव्याशी सातत्याने संबंध आल्याने त्या प्रांताशी दळणवळणाच्या सुविधा सुरू झाल्या. चालुक्यांनंतर इ.स. ७५४ ते ९७३ राष्ट्रकुटांचे, त्यानंतर इ.स. ११८९ ते १३१८ या कालखंडात यादवांचे राज्य या प्रदेशावर होते. मध्यंतरी सहाव्या शतकात कोंकणात मौर्यांनी राज्य केले. दक्षिण व उत्तर कोंकण तसेच कोल्हापुरात शिलाहारांनीही राज्ये केली. या सर्व राज्यकर्त्यांमध्ये सातत्याने लढाया होत. या लढायांचा आणि विविध राजवटींचा प्रभाव प्रदेशातील समाजघटकांवर होत होता. कर्नाटक, आंध्रप्रदेश, गोवा, कोंकण, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात दळणवळण सुरू

होते. ११८९ ते १३१८ या कालखंडातील यादवांच्या राज्यात संतचळवळीची खरी पार्श्वभूमी तयार झाली.

यादवांचे राज्य हे न्यायसंपन्न आणि कलागुणांना वाव देणारे होते. यादवांचा ऱ्हासकाळ हा संतचळवळीचा प्रारंभकाळ म्हटला जातो. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य निर्माण होण्यापूर्वी राहिलेल्या इस्लामी राजवटीत ही चळवळ व्यापक होत गेली. ज्ञानेश्वरांच्या अखेरच्या काळात अल्लाउद्दीन खिलजीच्या रूपाने महाराष्ट्रावर कोसळलेले इस्लामचे आक्रमण, उत्तरेकडील तीर्थयात्रेत इस्लामचे आक्रमक स्वरूप, परिणामी हिंदू धर्माला बसलेला मोठा धक्का त्याचबरोबर भौगोलिक कारणांनीही संत चळवळीला पोषण मिळाले. सततचे दुष्काळ, महामाऱ्या ह्यांमुळे ही माणसे ईश्वरास शरण येऊ लागली. धार्मिकतेची दिशा बदलत गेली. संकटातून मार्ग दाखवणारे म्हणून संतांकडे जनता जाऊ लागली. संत चळवळ आपले पाय रोवू लागली होती आणि पुढे फोफावलीही.

बहुतेक संत हे बलुतेदार, अलुतेदार आणि कुलकर्णी वर्गातून आले होते. बलुतेदार, अलुतेदार हे कारागीर वर्गात मोडत. म्हणून त्यांना कारू–नारू असेही म्हणत. ते गावातील दैनंदिन व्यवहार, शेतीशी संबंधित व्यवसाय सांभाळत. कुणबी समाज संख्येने अधिक असल्याने महत्त्वपूर्ण मानला जाई. ग्रामव्यवस्था लवचिक असे. गरजेनुसार किंवा परिस्थितीनुसार थोडेफार बदल केले जात. कारू–नारूंपैकी एखादे कुटुंब नाहीसे झाले तर इतर गावातून तसे कुटुंब आणून भरपाई केली जात असे. मुसलमानी आक्रमणे सुरू झाल्यानंतर त्यांना स्थान देण्यासाठी मुल्लाला सामावून घेण्यात आले. त्याला मुलाणा म्हटले जाई. ही ग्रामव्यवस्था इंग्रजी राजवटीने मात्र पद्धतशीरपणे ती उद्ध्वस्त केली.

हे राज्य आपले आहे, हा राजा आपला आहे, ही भावना प्रजेमध्ये शिवाजीच्या आगमनापर्यंत निर्माण होऊ शकली नव्हती. शिवाजीच्या आगमनापूर्वी अकराव्या शतकापासून चार वर्णांशिवाय 'अंत्यज' म्हणून एक पाचवा वर्णही समाजात अस्तित्वात होता. अंत्यज वर्णात कारागीर व हुन्नरी यांचा समावेश असे. धोबी, चांभार, कोष्टी, बुरूड, कोळी, खलाशी, पारधी आणि गारुडी हे धंदेवाले अंत्यज म्हणून गणले जात. याशिवाय हीन कर्म करणारे डोंब व चांडाळ हेही अंत्यज समजले जात. वैश्य व शूद्र यांत फारसा भेद केला जात नसे. ते एकमेकांत मिसळत. वैश्य शूद्रांच्या जोडीला बसत. ज्या वर्गाच्या श्रमावर समाजाचे भरण व पोषण चाले, त्या वर्गाची हेळसांड

होत असे. उत्पादक व व्यापारी वर्गाला समाजात मान नसे. अशा स्थितीत समाजाची आर्थिक घडी विस्कटली.

यादवांनी वैदिक यज्ञसंस्थेचे पुनरुज्जीवन केले. अनेक यज्ञ, ब्राम्हणभोजन, मोठमोठी मंदिरे उभारण्यात यादवांची संपत्ती खर्च होत होती. शिवाची आणि विष्णूची मंदिरे मोठ्या प्रमाणावर निर्माण होत होती. देवस्थानांमध्ये अगणित संपत्ती साठू लागली. ती संपत्ती लुटण्याकरिता गझनीचा महमूद आणि अन्य मुसलमान सुलतानांना मूर्तिभंजनाचा चेव येत असे. हेमाद्रीने स्थापत्यशास्त्रीय शिल्पकलेचे नमुने म्हणून महाराष्ट्रभर हेमाडपंथी देवळे बांधली. त्याने 'चतुर्वर्गचिंतामणी' हा २००० आचारधर्मांचा ग्रंथ लिहिला. व्रते, उद्यापने, संस्कारविधी, श्राद्धविधी आणि मुहूर्त यांनी भरलेला हा ग्रंथ होता. वाणी, कारागीर, शिल्पकार, शेतकरी अशा सर्वच वर्गांना पुरोहित वर्गाने जखडून टाकले होते. एकीकडे संरक्षणासाठी किल्ले बांधणे, सैन्यातील चतुरंगदळ वाढविणे, दुसरीकडे धार्मिकतेचे अवडंबर माजवणे यांमध्ये प्रचंड पैसा खर्च होत होता. शिवाय दुष्काळ, चोरलुटारूंचे उपद्रव, कारागीर, व्यापाऱ्यांचे समाजातील हीन स्थान यांमुळे बहुजन समाज दैन्यावस्थेला पोचला होता. वि.का. राजवाडे यांनी त्या काळातल्या महाराष्ट्रातल्या आर्थिक स्थितीचे विदारक वर्णन केले आहे. ते म्हणतात, 'मराठ्यांचे सर्व लक्ष परमार्थाच्या नावावर अधिक उपभोग घेण्याकडे लागले होते. 'चतुर्वर्ग चिंतामणी' ह्या ग्रंथात दर दिवसाला व दर तिथीला दहा–दहा, पाच–पाच व्रते सांगितली आहेत. त्या त्या व्रताला कोणत्या देवाची, कोणते पक्वान्न करून व किती ब्राम्हण जेवू घालून प्रीती संपादन करावी, ह्याची श्रुती, स्मृती, पुराणे ह्यांतून उतारे देऊन गंभीरपणे निर्णय केला आहे. व्रते, उद्यापने करण्याच्या निमित्ताने सुखैकपरायण व विलासमग्न झाले, हीच मराठ्यांच्या नाशाची तेराव्या शतकातील कारणे होती.'[१]

पुढे युद्धे, स्वाऱ्या यांमुळे उमराववर्गासह समाज सैरभैर होत होता. इतरत्र आश्रयाला जाणाऱ्यांची संख्या वाढली. इस्लामी राज्यकर्त्यांच्या दीर्घ काळात महाराष्ट्रीय समाजात अस्थिरतेचे वातावरण होते. मुस्लीम राज्यकर्ते आणि त्यांची प्रजा हे परस्परांहून धर्म, संस्कृती, भाषा या गोष्टींत भिन्न होते. यादवांचे राज्य संपुष्टात आल्यावर महाराष्ट्रीय समाजात जी पोकळी निर्माण झाली होती, ती भरून काढण्याचे काम संतमंडळींनी केले. बहुतेक संतांनी भक्तिमार्गाद्वारे समाजाला धर्माची शिकवण दिली.

महाराष्ट्रात प्राचीन काळापासून केवळ भारतातूनच नव्हे तर मध्य आशियाई प्रांतातून वेगवेगळ्या समाजाची माणसे येऊन स्थायिक होत गेली. म्हणजे येथील मूळचे लोक, विसर्जित सैन्यातून स्थायिक झालेले लोक आणि बाहेरून येऊन वसाहत करून राहिलेले लोक अशा संमिश्रणाने येथील जनसमूह तयार झाला. प्रत्येक समाज आपले विचार, आचार, देव, श्रद्धा, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा बरोबर घेऊन येत होता आणि आपली जात व संस्कार सांभाळून समाजातच, पण अलगपणे राहत होता. हा संमिश्र बहुजनसमाज म्हणजे आडमुठ्यांचा अव्यवस्थित जमाव होऊन बसला होता, असे राजवाडे म्हणतात. निश्चित देव नाही, निश्चित धर्म नाही, अक्षर नाही असे त्या समाजाचे स्वरूप होते. एकत्र राहिल्याने या समाजाच्या बोलभाषांचे मिश्रण होऊ लागले. पूर्वीच्या महाराष्ट्री आणि प्राकृत भाषांचे राहिलेले अवशेष आणि या विविध बोलीभाषांचे मिश्रण यांच्या संमिश्रणातून येथील मूळ लोकांच्या बोलींच्या पायावर जी सामान्य भाषा तयार झाली, तीच मराठी भाषा होय.

सोळा—सतराव्या शतकात नानाप्रकारचे धर्मग्रंथ प्रचलित होते. शैव, शाक्त, वैष्णव, दत्त, महानुभाव इत्यादी अनेक संप्रदायांची स्वतंत्र दैवते आणि उपासनापद्धती रूढ होत्या. श्रद्धा—अंधश्रद्धांचे प्रमाण फार होते. पशुबळी, नरबळी हे क्रूर प्रकार होते. वेताळ, जाखाई, जोखाई, मरिआई अशा क्षुद्र देवतांची उपासना, भुतेखेते, मंत्र, जादूटोणा असे प्रकार चालत. या सर्वांतून समाजाला बाहेर काढण्याची गरज होती. साधा, सोपा, सुसंस्कृत धर्म शिकविणे आवश्यक होते. हे कार्य संतमंडळींनी केले.

दुष्काळी परिस्थिती, इस्लामी जाचक राजवट ही दोन कारणे संत चळवळीच्या मागे असली तरी काही आश्चर्यकारक उल्लेखही आढळतात. दख्खनमधील पातशहा उत्तरेकडील मुस्लीम राजवटीइतके कडवे व जुलमी नव्हते. हिंदुस्थानावर राज्य करताना आपण बाहेरच्या प्रदेशातून आलो आहोत, याची जाण त्यांना होती. हिंदूंच्या ग्रामसंस्थेत, न्यायसंस्थेत त्यांनी ढवळाढवळ केली नाही. हिंदू साधूसंतांचा मान ठेवणारा, नरसिंह सरस्वतींना आपल्या राजवाड्यात नेऊन त्यांची पूजा करणारा बिदरचा अल्लाउद्दीन दुसरा, सरस्वती देवीचा भक्त विजापूरचा आदिलशहा दुसरा इब्राहिम असे अनेक मुसलमान हिंदू देवांचे भक्त होते. जनार्दनस्वामी, एकनाथ हे मुस्लीम अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करीत होते. मुस्लीमांकडून खंडोबाला मल्लूखान व अमजतखान तर दत्तात्रयाला शहादत्त व अल्लमप्रभू अशी नावे दिली गेली, अशी माहिती डॉ. जी.टी. कुलकर्णी यांच्या 'डेक्कन (महाराष्ट्र) अंडर द मुस्लीम

रुल्स फ्रॉम खिलजी टू शिवाजी — ए स्टडी इन इंटरॅक्शन' या प्रबंधात आढळते. बा.रं. सुंठणकरांनी या माहितीचे संकलन त्यांच्या 'महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य' या ग्रंथात केले आहे.

संत एकनाथांच्या चांगल्या पर्जन्यमानाच्या काळात संत चळवळीचा विस्तार होत गेला. समाजाची कर्मठ विचारांतून सुटका करणे, हे ध्येय व समाजातील खालच्या स्तरातही विठ्ठलभक्तीचे लोण पोचविण्यात एकनाथांच्या भारूडांचा मोठा सहभाग आहे. सोळाव्या—सतराव्या शतकात मुसलमानी पातशाह्या आपापसात लढत होत्या. त्यांनी एकवटून विजयनगरचे साम्राज्य नष्ट केले. धर्माच्या नावाखाली अनाचार होत होते. क्षुद्र देवीदेवता, भुतेखेते, जादूटोणा, तंत्रमंत्र, दांभिक साधू ह्यांचेही आव्हान होते. तुकोबांच्या अभंगातही त्याचे उल्लेख आलेले आहेत. संत तुकारामांचा प्रांत देहूचा मावळ परिसर होता. याच भागात छत्रपती शिवाजी महाराजांना पहिले अनुयायी मिळाले आणि मावळ्यांची संघटना उभी झाली. तुकोबांचे कार्य हे शिवरायांच्या राज्यस्थापनेला पोषक असे होते. त्यांनी रचलेले पाइकीचे अभंग प्रसिद्ध आहेत. मावळ श्रोत्यांना तुकोबांनी पाइकपणाचा संदेश देत कार्यप्रवृत्त केले. त्यांच्यात जागृती घडवून आणली, ज्याचा फायदा शिवरायांना झाला. कर्मयोगी रामदासांच्या काव्यात महाराष्ट्र धर्माविषयीचे प्रेम उफाळून आले आहे. बारा वर्षे भ्रमण करून त्यांची सामाजिक व राजकीय जीवनाची संवेदना प्रखर व तीव्र झाली होती. शिवाजीच्या राज्यस्थापनेच्या प्रयत्नात सामान्य जनांची अनुकूल मनोवृत्ती तयार करण्याचे कार्य रामदासांनी केले.

'ज्ञानेश्वरांनतर महाराष्ट्रात झालेले भयानक परकीय आक्रमण केवळ राजकीय होते, ही समजूत बरोबर नाही. राजकीय आक्रमणाप्रमाणेच ते त्यापेक्षाही भयानक असे धार्मिक, सांस्कृतिक व भाषिक आक्रमण होते. ते केवळ बळानेच नव्हे तर छळाने, कपटाने व युक्तीनेही चालले होते. त्यामुळे सगळा महाराष्ट्र प्रत्यक्षाप्रत्यक्ष अविंध्य बनण्याचा धोका निर्माण झाला होता.'[२] दुसरीकडे उच्चवर्णीयांनी आपले वर्चस्व गाजविण्यास प्रारंभ केला होता. सामान्यजनांना वेठीस धरले जात होते.

हेमाद्रीच्या 'चतुर्वर्ग चिंतामणी' या ग्रंथावरून असे जाणवते, की त्याकाळी लोकप्रवृत्ती व्रतवैकल्यांकडे झुकलेली होती. 'ज्याकाळी लोकांत स्वास्थ्य असते, अशा काळातच ही गोष्ट शक्य असते. तसेच व्रत करण्यास लोकांजवळ पैसाही मुबलक असावा लागतो. यावरून असे दिसते की लोकांच्या मनावर रूढींचा पगडा बराच होता. याची प्रतिक्रिया म्हणून नाथ,

लिंगायत, महानुभाव, वारकरी, इत्यादी पंथ उदयास आले. या पंथांनी आपली दारे समाजातील सर्व घटकांना खुली केली. त्यामुळे समाजातील अनेक लोक या पंथांत सामील झाले'.[३]

एक काळ असा होता की संत हे 'टाळकुटे, देशबुडवे' अशी दूषणे देऊन त्यांच्या कार्याचे अवमूल्यन केले जात होते; पण अनेक परकीय आक्रमणानंतरही समाजाचा गाडा टिकवून ठेवणारे संतच होते. समाजसुधारणेचा पाया उभारणारे संतच होते. विविधतेने नटलेल्या जनसमुहाला सुसंस्कृत धर्माची दीक्षा देणारे संतच होते. दिशाहीन समाजाला रूळावर आणणारेही संतच होते.

समाजात धर्म आणि संस्कृतीचा मिलाफ होता. मुस्लीम आक्रमणानंतर मुल्लाला गावगाड्यात सामावून घेतले गेले. ज्ञानेश्वरांचे कुटुंब, कान्होपाठक, जगमित्र नागा, साळ्या रसाळ, परिसा भागवत, विसोबा खेचर हे ब्राम्हण होते. गोरा हा कुंभार, नामदेव हा शिंपी, जोगा परमानंद हा तेली, नरहरी हा सोनार, सावता हा माळी, सेना न्हावी, चोखामेळा हा महार, तर चोंभा हा कोळी होता. संतांचे व्यवसाय बघितले तर लक्षात येतें की ज्ञानेश्वरांचे कुटुंब, जगमित्र नागा हे कुलकर्णीपण करणारे, कान्होपाठक हे जोशीपण करणारे, नरहरी सोनार, विसोबा खेचर, सराफीचा व्यवसाय करणारे, तर नामदेव हे कापड व्यवसाय करणारे होते. परिसा भागवत हा प्रवचनकार, तर जनाबाई ही दासी म्हणजे कुळंबीण होती. या माहितीवरून एक गोष्ट लक्षात येते ती ही की विविध जातींना आपल्या पारंपरिक व्यवसायाशिवाय इतर व्यवसाय करण्याची मुभा होती. जातीबंधने शिथिल होती.

बाराव्या शतकात मराठी बोलीला भाषेचे स्वरूप प्राप्त झाले. ही भाषा बोलणारा समाज स्थिर झाला होता. वाङ्मयनिर्मिती सुरू झाली. ही भाषा बोलणारे प्राकृत जन उदयास आले. यामध्ये भारताच्या निरनिराळ्या प्रांतातून आलेले विविध राजांच्या सैन्यातील पराभूत झालेले सैनिक किंवा खालसा अथवा विसर्जित झालेल्या राज्यातील सैनिक, त्यांची कुटुंबे यांचाही समावेश होता. पूर्वीच्या महाराष्ट्री आणि प्राकृत भाषांचे राहिलेले अवशेष आणि या विविध बोलीभाषांचे मिश्रण यांच्या संमिश्रणातून येथील मूळ लोकांच्या बोलींच्या पायावर जी सामान्य भाषा तयार झाली, तीच मराठी भाषा. अन्य बोलींपेक्षा मराठी भाषेला प्रभुत्व प्राप्त झाले. बाकीच्या बोली समूहापुरत्या मर्यादित राहिल्या, मागे पडल्या. ज्ञानेश्वरीची निर्मिती ही या प्रभुत्वाची साक्ष देणारी ठरली. पुढे वर्चस्व गाजवणाऱ्या महाराष्ट्रातील मराठी भाषेतच बहुतेक संतांनी आपल्या रचना केल्या. एक आश्चर्य असे की इतकी वर्षे फारसी

आक्रमणाखाली हा प्रदेश राहूनही संतमंडळींनी आपल्या रचनांमध्ये फारसी, उर्दू शब्दांना फारसा वाव दिलेला नाही. मराठी भाषेचे शुद्धपण त्यांनी टिकवले.

भागवत धर्माचा आधार घेऊन संतांनी समाजाला नेतृत्व देण्याचे कार्य केले. हे नेतृत्व धार्मिक असणे स्वाभाविक होते. गीता, पुराणे यांच्या आधारे संतांनी धर्मप्रचार केला. वेगवेगळे समूह येथे स्थायिक झाल्याने सर्वांमध्ये एकसूत्रता आणणे गरजेचे होते. क्षुद्र देवीदेवता, भुतेखेते, जादूटोणा, मंत्रतंत्र, यांतून समाजाला बाहेर काढण्याकरिता व पशुबळी, नरबळी रोखण्याकरिता संतांनी भक्तिमार्गाचाच पुरस्कार केला. पंढरीचा पांडुरंग उभा करून सामान्य जनांना एकेश्वरवादाच्या सूत्रात बांधले. या सर्व कारणांनी इस्लामी आक्रमणापुढेही महाराष्ट्रीय समाजाचा गाडा टिकून राहिला तसेच समाजाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन पोट भरणाऱ्या भिक्षुक वर्गाला बराच आळा बसला.

## संत साहित्य निर्माते विविध पंथ व संप्रदाय

संप्रदाय व पंथ हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरले जात असले तरीही बारकाईने पाहिले, तर त्यातून दोन भिन्न गोष्टी सूचित होतात. संप्रदाय शब्दावरून परंपरा सूचित होते. दैवी अनुभूतीसंपन्न अशा एखाद्या पुरुषापासून परंपरा सुरू होते. त्यास संप्रदाय म्हटले जाते. ही अनुभूती मानवी जीवनात प्रत्येकास घेता आली पाहिजे, या तळमळीने काही विशिष्ट साधनेची रूपरेषा संप्रदाय प्रवर्तकांकडून निश्चित केली जाते. अनुभूती ध्येयाकडे नेण्याचा तो मार्गक्रमच आखलेला असतो. त्या मार्गक्रमासच पंथ हे नाव लागू पडते.

काही संप्रदाय मध्ययुगापूर्वीपासून अस्तित्वात होते. तर काही मध्ययुगात निर्माण झाले. संत वाङ्मय हे संप्रदायातून निघालेले आहे. खरे पाहता संप्रदायाच्या चौकटीबाहेरील बऱ्याच लहानमोठ्या कवींनी स्वयंस्फूर्तीतून वाङ्मयनिर्मितीचा प्रयत्न केला; पण त्यापैकी कोणालाच महाराष्ट्रीयांच्या मनात विशेष स्थान मिळाल्याचे दिसत नाही.

## नाथ संप्रदाय

नाथ संप्रदाय हा एक योगप्रधान शैव संप्रदाय आहे. या संप्रदायाच्या अनुयायांचे अंतिम उद्दिष्ट नाथपदप्राप्ती म्हणजेच शिवत्वाची प्राप्ती हे आहे. नाथ संप्रदायाचा उगम परमेश्वरापासूनच झाला आहे व आदिनाथ किवा शिव हेच सर्वप्रथम नाथ असून ह्या पंथाचे संस्थापक शिव म्हणजे प्रत्यक्ष शंकरच

होत, असे मानले जाते. वाङ्मयात या संप्रदायाचे 'सिद्धमार्ग,' 'अवधूत मार्ग', 'योगमार्ग' असेही उल्लेख आहेत. काही ग्रंथांतून याला सिद्धमत, योगबीज, योग संप्रदाय, अवधूतमत, अवधूत संप्रदाय अशाही नावांनी उल्लेखिलेले आहे. या संप्रदायातील प्रमुख व्यक्ती :

१. मत्स्येंद्रनाथ / मच्छिंद्रनाथ (९ वे – १० वे शतक)
२. जालंधरनाथ (१० वे – ११ वे शतक)
३. गोरक्षनाथ / गोरखनाथ (१० वे – ११ वे शतक)
४. गहिनीनाथ (इ.स. सुमारे १२००)

उत्तर हिंदुस्थानात उगम पावून दक्षिणेकडे महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणादी भागात संचार केलेला हा पंथ दक्षिणेत टिकू शकला नाही. नाथ संप्रदायात बाह्याचारांवर जास्त महत्त्व दिले गेले, त्यामुळे शुद्ध योगाभ्यासाचा अनुभव व बोध मागे पडून सांप्रदायिकांमध्ये विकृती उत्पन्न झाली. तसेच या पंथाची उत्तरेत भरभराट झाली व तिचा प्रसार होत होत दक्षिणेकडे येऊन तेथे रुजेपर्यंत भक्तिविषयक अथवा नामस्मरणपर सूक्ष्म आकर्षण मूळत:च असल्याने हा पंथ वारकरी पंथाच्या प्रवाहात विलीन झाला.

## महानुभाव पंथ

महानुभाव पंथाचा उगम अतिशय समृद्ध असा झाला. यादवकाळात इसवीसनाच्या तेराव्या शतकात चक्रधरस्वामींच्या पुढाकाराने उदयास आलेल्या ह्या पंथाची पुढील दोन–तीन शतके मोठी भरभराटीची गेली. 'महानुभाव'सोबतच या पंथाची महात्मा, अच्युत, जयकृष्णी, भटमार्ग, परमार्ग अशीही नावे आहेत. एकनाथांच्या काळापासून हा 'मानभावपंथ' या नावाने ओळखला जातो. 'महानुभाव याचा अर्थ 'महान अनुभव: तेज: बलं वा यस्य स: महानुभाव:' याप्रमाणे केला असता मोठ्या तेजाने युक्त असलेल्या लोकांचा पंथ हा महानुभाव पंथ असे म्हणता येईल.'[४] महानुभावांच्या वाङ्मयनिर्मितीने मराठी साहित्याला समृद्धी दिली.

मराठीत गद्यचरित्रलेखनाच्या मुहूर्तमेढीचे श्रेय महानुभावांचे आहे. म्हाइंभटाने स्मरणशक्तीतून आणि सत्यनिष्ठेची प्रतिज्ञा घेऊन लिहिलेले 'लीळाचरित्र' हे चरित्रलेखनाचा आदर्श तर ठरलेच, पण उभ्या मराठी वाङ्मयाचा मानदंडही झाले. नरेंद्र, भास्करभट्ट यांसारखे रसिक कवी, दामोदर पंडितांसारखे भाष्यकार, महदंबेसारखी मराठीतील पहिले कथाकाव्य लिहिणारी कवयित्री असे अनेक रचनाकार महानुभावीय प्रेरणेने प्रेरित होऊन लिहिते झाले.

स्त्रियांनी रज:स्वला स्थितीत विटाळ पाळण्याची आवश्यकता नाही असे महदाइसेला सांगून चक्रधरांनी एक नवीन विचार त्या काळात जगापुढे मांडलेला दिसतो.

महानुभाव पंथातील महत्त्वाच्या व्यक्ती :

१. चांगदेव राऊळ

२. श्री गोविंदप्रभू (इ.स. ११८७ ते १२८७)

३. चक्रधर (इ.स. ११९४ ते १२७२)

४. नागदेवाचार्य (तेरावे शतक)

५. महदाइसा (इ.स. १२४२ – १३१२ किंवा इ.स. १२२८ – १३०३)

'सूत्रपाठ' या ग्रंथास 'महानुभवांचा वेद' असे म्हटले जाते. त्यातून महानुभावांचे सारे तत्त्वज्ञान विशद झाले आहे. हा पंथ द्वैती मताचा आहे. प्रपंचास महानुभाव अनित्य मानतात. देवतांना महानुभावांनी गौण मानले आहे. त्यांच्या मते देवता नित्यबद्ध आहेत. त्या ज्ञान, ऐश्वर्य देऊ शकल्या तरी परमेश्वर होऊ शकणार नाहीत. महानुभाव पंचकृष्णांच्या वचनांनाच प्रमाण मानतात. चक्रधरांची वचने ही महानुभावांची 'श्रुती' होय. नागदेवाचार्यांच्या वचनांस ते 'स्मृती' म्हणतात.

महानुभावीय वाङ्मयात 'लीळाचरित्र', 'श्रीगोविंदप्रभुचरित्र', 'दृष्टांतपाठ', 'सूत्रपाठ', 'मूर्तिप्रकाश', 'स्मृतिस्थळ', 'महदंबेचे धवळे', 'मातृकी रुक्मिणीस्वयंवर', साती ग्रंथ इत्यादी महत्त्वपूर्ण वाङ्मय आढळते. साती ग्रंथांमध्ये 'शिशुपालवध', 'उद्धवगीता अथवा एकादशस्कंद', 'वछाहरण', 'रुक्मिणी स्वयंवर', 'ज्ञानप्रबोध', 'सैह्याद्रिवर्णन', 'श्रीऋद्धिपुरवर्णन' यांचा समावेश होतो. 'मराठी वाङ्मयाची गंगोत्री' म्हणून महानुभावीयांच्या ज्ञानेश्वरपूर्व ग्रंथनिर्मितीकडे बोट दाखविण्यास हरकत नाही.

महानुभाव पंथात स्त्रीशूद्रादिकांना धर्ममंदिरात इतरांच्या बरोबरीने प्रवेश मिळाला. स्त्रीपुरुषांना संन्यास घेण्याची मोकळीक ठेवली गेली. चातुर्वण्याविरोधात आपले टीकास्त्र महानुभावांनी उपसले.

महानुभाव पंथाच्या अप्रीतीची अनेक कारणे महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे यांनी सांगितली आहेत. त्यात मुसलमानी राज्यकर्त्यांकडून युक्तिबळावर मिळवलेल्या काही खास सवलतींचा उल्लेख आहे. औरंगजेबासारख्या राज्यकर्त्याने जिझिया करात माफी देऊन हा पंथ अहिंदू असल्याचे घोषित केले. यादवकाळातील काही खास व्यक्तींची या पंथाकडे ओढ तसेच महानुभावीय संन्याशांची भिन्न राहणी, विटाळ–चांडाळाच्या व

शूचिअशूचित्वाच्या कल्पना, त्यांचा पेहराव, पद्धती व रूढ चालीरीती पाळण्यातील शिथिलता याशिवाय चक्रधरांच्या चारित्र्यावरील संशय, पंथीयांना आचारधर्मानुसार पाळाव्या लागणाऱ्या जाचक गोष्टी यामुळे सामान्य माणसे या पंथापासून दूर गेली. चक्रधर–नागदेवाचार्य यांच्यानंतर प्रभावी पंथप्रचारक न मिळाल्यामुळे या पंथाची प्रगती खुंटली. तसेच सर्वांना न झेपणारा संन्यासमार्ग, गावापासून दूर विजनवास पत्करण्याचा उपदेश, कायाक्लेश व अतिरेकी देहदंडनाची शिकवणूक, कदान्न व भिक्षान्न यांवर निर्वाह करण्याचा दंडक, इतर पंथीयांच्या मानाने देवतांविषयीची स्वीकारलेली संकुचित वृत्ती अशा अनेक कारणांमुळे या पंथाबद्दलची अप्रीती वाढत गेली व लवकरच या पंथाला आपला गाशा गुंडळावा लागला

## दत्त संप्रदाय

दत्तभक्तीची विशिष्ट परंपरा गेली पाचशे वर्षे महाराष्ट्रात चालू आहे. ती लोकप्रिय असून बहुजन समाजावर तिचा प्रभाव आहे. शैव, वैष्णव व शाक्त या तीनही उपासना प्रवाहात दत्तास मानाचे स्थान आहे. वारकरी, महानुभाव, समर्थ या संप्रदायांतही दत्तास मान दिला जातो. दत्त संप्रदायाचे उल्लेख महाभारत, पुराण अशा प्राचीन ग्रंथांत आढळतात.

दत्तावताराबद्दल निरनिराळ्या कथा आढळतात. अत्री ऋषींनी पुत्रप्राप्तीकरिता घोर तपश्चर्या केली असता त्यांच्या मस्तकातून ज्वाला निघून त्रैलोक्याचा दाह होऊ लागला. त्यावेळी सर्व देव तेथे उपस्थित होऊन त्यांनी अत्री ऋषींना ब्रम्हा, विष्णू, महेश यांचा अंशरूप पुत्र होईल असा वर दिला. या आशीर्वादाने अत्रींना अनसूयेच्या पोटी जो पुत्र झाला, त्याचे नाव दत्त.

दत्त जन्माची दुसरी प्रचलित कथा म्हणजे ब्रम्हा, विष्णू, महेश अत्री ऋषींची पतिव्रता पत्नी अनसूया हिचे सत्त्व हरण करण्याकरिता आश्रमात आले असता अनसूयेने पतीच्या चरणाचे तीर्थ त्यांच्या मस्तकावर शिंपडले व तिघांनाही लहान बालकाचे स्वरूप प्राप्त करून दिले. तीनही देवांच्या पत्नी आपापले पती परत मागू लागल्या. तेव्हा अनसूयेने तीन बालके त्यांच्यासमोर ठेवली. त्यांना आपापले पती ओळखता येईना. तेव्हा अनसूयेने त्यांना पूर्वरूप प्राप्त करून दिले. या तिन्ही देवांनी अत्री ऋषींना वर मागण्यास सांगितले असता 'तुम्ही तिघांनी माझ्या घरी पुत्ररूपाने यावे' असा वर मागितला. नंतर त्यांना जो पुत्र झाला तो दत्तावतार होय.

भागवताच्या 'एकादशस्कंधा'त अवधुताने म्हणजे दत्ताने केलेल्या चोवीस गुरूंची कथा आहे. यादवांचा पूर्वज जो यदू याने अवधुतास परमानंद कोठून कसा मिळाला हे विचारल्यावरून अवधुताने आपली चोवीस गुरूंची नामावली सांगून कोणापासून कोणता गुण घेतला आहे, तेही सांगितले आहे. पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश या पंचमहाभूतांपासून काही तत्त्वे त्यांनी ग्रहण केली. पशुपक्ष्यांपासून काही गुण घेतले. त्यांनी जगच गुरुरूप मानले.

दत्त संप्रदायातील गुरुपरंपरा याप्रमाणे दिली आहे – शंकर, विष्णू, ब्रम्हदेव, वसिष्ठ, शक्ती, पराशर, गौडपादाचार्य, गोविंदाचार्य, शंकराचार्य, विश्वरूपाचार्य, ज्ञानगिरीय, सिंहगिरीय, ईश्वरतीर्थ, नृसिंहतीर्थ विद्यातीर्थ, शिवतीर्थ, भारततीर्थ, विद्यारण्य, मळीमहानंद, देवतीर्थ सरस्वती, यादवेंद्रतीर्थ सरस्वती, कृष्णसरस्वती, नरसिंह सरस्वती, माधव सरस्वती.

दत्त संप्रदायातील प्रमुख पुरुष :

१. श्रीपाद श्रीवल्लभ (इ.स. १३२० – १३५०)

२. नृसिंह सरस्वती (इ.स. १३७८ – १४५८ किंवा १४५८ – १५१८)

३. सरस्वती गंगाधर / गंगाधर सरस्वती (जन्म इ.स. १४२८ किंवा १५२८)

४. जनार्दनस्वामी (इ.स. १५०४ – १५७५)

५. दासोपंत (इ.स. १५५१ – १६१५)

याशिवाय माणिकप्रभू, नारायण महाराज जालवणकर, वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंबेस्वामी, अक्कलकोटचे स्वामी हे दत्त संप्रदायातील नावजलेली संत मडळी आहेत.

दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान असे सांगण्यात येते की, ब्रम्ह हे अखिल, अभंग, निरूपाधिक, निस्संग, करून अकर्ते, भोगून अभोक्ते, शुद्ध, शांत, निर्गुण, निरामय, नित्यानंद व मनाला अगोचर आहे. ब्रम्हांड रचणारे व इंद्रियांचे चालक तेच आहेत. तेच जगद्रूपाने नटले आहे. ते ज्ञानसृष्टीने जाणता येते. मूळ परब्रम्हाची त्याहून भिन्न नसणारी जी इच्छाशक्ती तीच प्रकृती होय. ही इच्छाशक्ती अपरिमित असून तिच्यातूनच त्रिगुणात्मक माया भूतसृष्टी व तिन्ही लोक उत्पन्न होतात. जे मूळ परब्रम्ह स्वरूपच आहेत, परंतु भिन्न भिन्न देह धारण केल्यामुळे भिन्न भिन्न दिसतात, ते जीव होत. ब्रम्हा, विष्णू, महेश, सूर्य, अग्नी इत्यादी ईश्वराची अनेक रूपे मानली आहेत; परंतु ती एका देवाचीच रूपे आहेत. ईश्वर कोणालाही दिसत नाही. ईश्वर व आत्मा अभिन्न आहेत. आरशावरील प्रतिबिंबाप्रमाणे सर्व जग परमेश्वराच्या स्वरूपातच प्रकट झाले आहे. सृष्टीच्या पूर्वी एक अद्वितीय, पूर्ण, स्वतंत्र असा महेश्वर होता, अशी

श्रुती आहे. त्या महेश्वराने इच्छास्वातंत्र्याच्या जोरावर, स्वतःचेच रूप असलेल्या पडद्यावर जगद्रूपी चित्र रंगवले आहे, असे दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान आहे.

जीवनाचे ध्येय जे मोक्ष ते साधण्याकरिता दत्तसंप्रदायात सगुणोपासना आणि योगमार्ग यांचे आचरण सांगितले आहे. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी या आठ महासिद्धीचे वर्णन केले आहे. योगाभ्यासाने या सिद्धी प्राप्त होतात; परंतु साधकाने त्यात न गुंतता आपले ध्येय साधले पाहिजे. दत्तात्रेयाचे मत वेदाचार, शास्त्राचार, श्रेष्ठाचार, वृद्धाचार, कुलाचार, देशाचार, जनाचार, लौकिकाचार यांप्रमाणे आचार पाळावेत असे होते. नृसिंह सरस्वतींनी कर्ममार्ग अथवा शास्त्रोक्त आचारधर्म यावर भर दिला आहे. 'दत्त संप्रदाय आणि मराठी भक्तिपरंपरा यांत सगुणोपासना आणि गुरुभक्ती हे समान विशेष आहेत; परंतु दत्तात्रेयाच्या सगुण साक्षात्कारासाठी दत्तोपासक अत्यंत कठोर अनुष्ठाने आचरतात, कायाक्लेश करून घेतात व प्रसंगी आत्महत्येलाही प्रवृत्त होतात.'[५]

दत्त संप्रदायामध्ये ब्रम्हा, विष्णू आणि महेश या त्रिमूर्तींचे ऐक्य मानल्यामुळे शैव आणि वैष्णव यांच्यामधील विरोध नाहीसा करण्याची कामगिरी या पंथाने केली. या संप्रदायातील जनार्दनस्वामींसारख्या सत्पुरुषांनी मुसलमान वर्गातही स्वतःविषयी आदरभाव निर्माण केला. हिंदू—मुसलमान भेद बऱ्याच अंशी कमी केला.

## समर्थ संप्रदाय

देवगिरीचा पाडाव झाल्यानंतर यादवांचे राज्य नष्ट झाले व त्याबरोबरच महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याचा अस्त होऊन पारतंत्र्य आले. या पारतंत्र्याच्या काळात मुसलमानी राजसत्तेचा जाच महाराष्ट्राच्या जनतेला सोसावा लागला. कित्येक देवालये मोडली, तीर्थस्थाने भ्रष्ट झाली, स्त्रियांवर अत्याचार झाले. अशा दुःसह परिस्थितीमध्ये वैदिक वर्णाश्रमधर्माचे पुनरुज्जीवन रामोपासनेच्या अधिष्ठानावर करणारा संप्रदाय रामदास स्वामींनी सुरू केला. तो 'रामदासी संप्रदाय' होय. या संप्रदायास श्री संप्रदाय, महाराष्ट्र धर्म, रामदासी संप्रदाय, दास संप्रदाय, अथवा समर्थ संप्रदाय अशी नावे आहेत.

आदीनारायण — महाविष्णू — हंस — ब्रम्हदेव — वसिष्ठ — राम — रामदास याप्रमाणे गुरुपरंपरा आहे. श्री रामदास स्वामी 'समर्थ' हे विशेषण

श्रीरामाला लावीत असत. समर्थ म्हणजे रामदासांना श्रीरामाचे सामर्थ्यसंपन्न रूप अभिप्रेत आहे.

समर्थ संप्रदायातील प्रमुख व्यक्ती :

१. रामदासस्वामी (इ.स. १६०८ ते इ.स. १६८१)

२. गंगाधर उर्फ रामीरामदास (इ.स. १६०५ ते १६७७)

३. कल्याणस्वामी (इ.स. १६१८ – १७१४)

४. दिनकरस्वामी (इ.स. १६२८ – १७०३)

५. वेणाबाई (इ.स. १६२७ – १६७८)

याशिवाय गिरिधरस्वामी, मेरुस्वामी, भीमस्वामी, आत्माराम महाराज यांचीही नावे समर्थ संप्रदायातील थोर पुरुषांत गणली जातात. समर्थांच्याच कालखंडात आणखी चार संत होऊन गेले. त्यांचा व समर्थांचा चांगला स्नेहसंबंध होता. ते चौघेजण म्हणजे जयरामस्वामी वडगावकर, रंगनाथस्वामी निगडीकर, केशवस्वामी भागानगरकर व आनंदमूर्ती ब्रम्हनाळकर. या सर्वांना समर्थांचे श्रेष्ठत्व मान्य होते. म्हणून हे पंचायतन 'समर्थ पंचायतन' म्हणूनही ओळखले जात होते.

रामदासी संप्रदायाचा अधिकृत ग्रंथ 'दासबोध' होय. यातच त्यांच्या तत्त्वज्ञानाचे विवरण आलेले आहे. परंपरागत अद्वैत तत्त्वज्ञान सुगमरीतीने त्यांनी मराठी भाषेत मांडलेले आहे. अध्यात्मविद्या ही सर्व विद्येचे सार आहे. चौदा विद्या, चौसष्ट कला यांहून सर्वात श्रेष्ठ व मोक्षप्राप्ती करून देणारे आत्मज्ञान आहे. जीव हा परब्रम्हापासून अभिन्न आहे, हे ओळखणे म्हणजे आत्मज्ञान होय. परब्रम्ह हे निर्गुण, निराकार आहे, शब्दब्रम्ह हे नुसते शाब्दिक व अनुभवरहित असल्यामुळे तेथे शाश्वत स्वरूपाचा विवेक नाही, ब्रम्ह हे निर्गुण, निराकार, निर्विकार, शाश्वत, दृश्य व शून्य याहून निराळे म्हणजे केवळ ज्ञानस्वरूप आहे. ब्रम्हाचे ठिकाणी केवळ देहबुद्धीचा मोठेपणा चालत नाही. सर्वांच्या ठायी एकच ब्रम्ह वसलेला आहे.

आपणांस दिसणारे सर्व दृश्य व पंचमहाभूतांचा विस्तार ही सर्व माया होय. ब्रम्हज्ञानाने मायेचा निरास होतो, असे त्यांचे प्रतिपादन आहे. शाश्वत आत्मा ग्रहण करून नाशवंत प्रपंचाचा त्याग केला पाहिजे, असे रामदासांचे म्हणणे आहे.

वारकरी संप्रदाय व समर्थ संप्रदाय यांचे तत्त्वज्ञान अगदी भिन्न आहे, असा समज आहे, परंतु 'परमार्थसिद्धी, आत्मसाक्षात्कार हेच मनुष्यमात्राचे अंतिम साध्य आहे, असे दोन्ही संप्रदाय मानतात. समर्थांचे उपास्य दैवत

रामचंद्र; पण राम आणि विठ्ठल यांतले भेद ते मानत नाहीत. विठ्ठलाचा अवतार पतितांना पावन करण्यासाठी दीन, अनाथांना तारून नेण्यासाठी आहे, तर रामचंद्रांचा अवतार दुष्टांच्या निर्दालनासाठी, राक्षसांच्या विनाशासाठी होता, पण कोदंडधारी रामाची पतितपावन म्हणूनही व्याप्ती आहे. पतितपावनाचा दास म्हणवून घेण्यात रामदासांना भूषण वाटत होते.'[६]

रामदासांच्या मते ब्रम्हज्ञान हे सर्वात श्रेष्ठ ज्ञान आहे. वर्णाश्रमधर्माची विहित कर्मे प्रत्येकाने आचरली पाहिजेत. त्याने चित्तशुद्धी होते, आणि उपासनेने संशयनिवृत्ती होऊन देव सापडतो. सर्व भक्तींमध्ये 'आत्मनिवेदन' ही नववी भक्ती त्यांनी श्रेष्ठ मानली आहे, कारण या भक्तीतच देव आणि भक्त यांच्या ऐक्याचा अनुभव येतो. सांप्रदायिकाने स्वतः दरिद्री राहून समाजसेवा केली पाहिजे. काया—वाचा—मनाने परोपकारार्थ झाले पाहिजे. त्यागी वृत्तीने राहिले पाहिजे. भिक्षा हे पोट भरण्याचे साधन नसून दीक्षा आहे. त्यावेळचा पुढारी जो ब्राम्हण वर्ग याला जी अवनत अवस्था प्राप्त झाली होती, ती दूर करण्यासाठी समर्थ संप्रदायाने कार्य केले. प्रयत्नांची पराकाष्ठा करूनच उन्नती साधता येते, हे पटवून दिले.

रामदासांच्या शिकवणुकीस काही मर्यादा पडल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात या संप्रदायाचा प्रसार मर्यादित स्वरूपात राहिला. प्रामुख्याने ब्राम्हणवर्गास डोळ्यासमोर ठेवून त्यांची काळजी व त्यांच्या ऐहिक व पारमार्थिक कल्याणाबद्दल त्यास उपदेश केला. भिक्षाटनास व कर्मठतेस अवाजवी महत्त्व दिले. त्यामुळे रामदासी भिक्षेकरी वर्ग निर्माण झाला. शिवरायांच्या राजकारणास त्यांनी अप्रत्यक्षपणे मदत केली; परंतु त्यांच्या शिष्यपरिवारातून मठाधिपती झालेल्यांनी राजकारणाशी फारसा संबंध ठेवला नाही. उलट कलह व अनावस्था निर्माण झाली. अशा अनेक कारणांनी समर्थ संप्रदायाला वारकरी संप्रदायाप्रमाणे जनमनाची पकड घेता आली नाही.

## जैन संप्रदाय

श्वेतांबर आणि दिगंबर असे दोन प्रकार जैन संप्रदायात आढळतात. जैन आचार्यांनी आणि कवींनी संस्कृत, अर्धमागधी, प्राकृत, शौरसेनी, कन्नड, तमिळ अशा विविध भाषांमध्ये साहित्यनिर्मिती केली आहे. धर्मापासून वैद्यकशास्त्रापर्यंत जैन साहित्य निर्माण झाले आहे.

मराठी भाषेत जैनांची साहित्यनिर्मिती पंधराव्या शतकात सुरू झाली. ब्रम्हगुणदास हा मराठी जैन साहित्यातील सुरुवातीचा ग्रंथकार. भूवनकीर्ती —

ब्रम्हजीनदास – ब्रम्हगुणदास अशी त्याची परंपरा दिसते. ब्रम्हजीनदास यांचे तीन शिष्य म्हणजे मल्लीदास, गुणदास व नेमीदास. इ.स. १४५१ पासून गुणदासाचे उल्लेख सापडतात. गुणकीर्ती (इ.स. १४५० ते १४७०) हे ब्रम्हगुणदासाच्या समकालीन असलेले एक श्रेष्ठ आचार्य होत. गुणदासांच्या नावावर 'श्रेणिक चरित्र', 'क्षमागीत', 'विंचूगीत', 'गाऱ्हाणे' व 'रामचंद्र हळदुली' अशा किरकोळ रचना आढळतात. गुणकीर्तीच्या नावावर 'धर्मामृत', 'पद्मपुराण', 'रुक्मिणीहरण', 'रामचंद्रफाग', 'गौलणीभास अथवा नेमिनाथविवाह', 'नेमिनाथपाळणा', 'नेमिनाथजीनदीक्षा', 'छंदगीत', 'रत्नकरंडश्रावकचारावरील टीका' असे ग्रंथ आढळतात. जीनदासांचा कार्यकाळ सुमारे १४९३ च्या आसपास होता. त्यांचा हरिवंशपुराण हा ग्रंथ अपूर्णावस्थेत राहिला. पंधराव्या शतकात उगम पावलेली मराठी जैन साहित्याची गंगा सोळाव्या शतकात वृद्धिंगत झालेली दिसते. त्यात पंडित मेघराज, कामराज, पंडित सुरीजन, नागोआया हे प्रमुख ग्रंथकार झाले. सोळाव्या शतकाच्या प्रारंभी पंडित मेघराज यांनी 'जसोधरदास', 'पार्श्वनाथ', 'भवांतर', 'कृष्णगीत', 'रामायणी कथा', 'गुजरी मऱ्हाटी गीत' अशी लहानमोठी रचना केली. यशोधरांचे चरित्र त्यांनी पाच अधिकारांत, ११६४ ओव्यांत वर्णन केले आहे.

कामराज नावाच्या कवीने 'सुदर्शनचरित्र' हे चरित्रात्मक आख्यानकाव्य लिहिले. या ग्रंथाचे १४ अधिकार असून २८७ ओव्या आहेत. 'चैतन्यफाग' नावाची १४ कडव्यांची रचना त्यांच्याच नावावर आहे. पंडित सुरिजन यांचा 'परमहंसकथा' हा ग्रंथ 'चंपुकाव्या'च्या धर्तीवर आहे. नागोआया यांचे 'यशोधरचरित्र' तर गुणनंदी यांचे 'जसोधरपुराण' हेही जैन मराठी वाङ्मयात आढळते.

सोळाव्या व सतराव्या शतकात कारंजा, औरंगाबाद, लातूर इत्यादी ठिकाणी जैन धर्मियांची पीठे विकसित झाली. धार्मिक आचार वाढले. परिणामी वाङ्मयनिर्मितीही वाढली. अभयकीर्ती नामक कवीने 'अनंतव्रतकथा' रचली. वीरदास ह्या कवीने 'सुदर्शनचरित्र' हा २५ अध्याय व १६५० ओव्यांचा ग्रंथ लिहिला. दामापंडिताने 'जम्बुस्वामीचरित्र', 'दानशीलतपभावना', हे दोन ग्रंथ लिहिले. दयासागर नावाच्या कवीने 'सम्यक्त्व कौमुदी', 'भविष्यदत्तबंधुपुराण', 'धर्मामृतपुराण' हे ग्रंथ रचले. चिमनापंडिताने 'अनंतव्रतमथा', 'तीर्थवंदना', 'गोमठस्वामीचरित्र', 'गुरुगीता', 'मातेची सोळा स्वप्ने' अशा रचना केल्या. ह्यांच्याव्यतिरिक्त भानुकीर्ती, ब्रम्हपुण्यसागर, महिचंद यांच्याही विविध रचना आढळतात. जैनांनी व्याकरण, ज्योतिष इ. शास्त्रांमध्येही वाङ्मयनिर्मिती केली.

## नागेश संप्रदाय

नागनाथ किंवा नागेश हे या संप्रदायाचे प्रवर्तक असल्यामुळे त्याला 'नागेश संप्रदाय' म्हटले गेले. नागेश संप्रदायाला वेगळे तात्विक अधिष्ठान आहे. सुरुवातीला चैतन्य संप्रदायाच्या परंपरेतून निघालेला हा संप्रदाय कालांतराने आपली वेगळीक निर्माण करून दीर्घकाळ टिकलेला दिसतो.

उदार अंत:करणाचा, हिंदू, मुसलमान, वैष्णव, वीरशैव या सगळ्यांना आस्थेने जवळ करणारा असा हा नागेश संप्रदाय. 'नागेशलीलामृत' हा नागेश संप्रदायाचा महत्त्वाचा ग्रंथ आहे. नागनाथांची भक्ती ज्या घराण्यात परंपरेने चालत आलेली आहे, त्या घराण्यातील भास्कर उर्फ भानजी नामक गृहस्थाने हा ग्रंथ लिहिलेला आहे. या ग्रंथाचा रचना काळ इ.स. १८४८ असला तरी नागेश संप्रदायाचे स्वरूप, त्यातील शिष्यपरंपरा, त्यातील स्थानमहात्म्य, त्याचे तत्त्वज्ञान, त्याचा चैतन्य संप्रदायाशी असलेला संबंध या सर्व मुद्यांवर भरपूर प्रकाश टाकणारा आहे. या ग्रंथात ४० अध्याय व ५३३४ ओव्या आहेत. ज्या भानजीत्रिंबक ह्यांनी 'नागेशलीलामृत' हा ग्रंथ रचून नागेश संप्रदायाचा इतिहास लिहिला, त्यांची गुरुपरंपरा अशी : अज्ञानसिद्ध – सिद्धलिंग – नागोजीबाबा – भूजंग – शिवराम – नागेश – भानजीत्रिंबक.

अज्ञानसिद्ध हे नागेश संप्रदायाचे आद्याचार्य. त्यांच्या नावावर 'संकटहरणी', 'वरदनागेश', 'स्वरूपनिर्माण', 'तत्त्वबोध', 'जीवब्रम्हाभेदलक्षण', 'पृच्छापत्र', 'काळज्ञान', 'अकालज्ञान' हे तात्त्विक ग्रंथ, तर भारूडे, स्तोत्रे, अष्टके, आरत्या, पोवाडे इत्यादी स्फुट रचना आढळतात. नागेश संप्रदायाचेच मन्मथ – शिवलिंगस्वामी ह्यांच्या नावावर 'स्वयंप्रकाश', 'अनुभवानंद', 'ज्ञानबोध', 'गुरुगीताटीका', 'शिवगीताटीका', 'परमरहस्यसारामृत' ह्या रचना आढळतात.

या पंथात कर्मकांड, कडक वैराग्य, संन्यास यांवर भर नसून सामान्य माणसाच्या मर्यादा लक्षात घेऊन त्याला भक्तिप्रवण करण्याची प्रेरणा त्यात आहे. तरीही या संप्रदायाने जनमानसाची फारशी पकड घेतलेली दिसत नाही.

## सूफी संप्रदाय

इस्लामच्या अंतर्गत असलेला एक पंथ म्हणून सूफी संप्रदाय ओळखला जातो. इस्लामच्या प्रारंभकाळात सूफींचा सगळा भर निवृत्तीमार्गावर होता. जगातील सर्व सुखांचा त्याग करून, कौटुंबिक लागेबंधे तोडून आणि

फकिरी पत्करून ते एकांतात कठोर तप करीत. देहदंडाच्या द्वारे ते परमेश्वराचा साक्षात्कार इच्छित. परमेश्वराच्या अवकृपेची त्यांना भीती वाटे. अबुदरदा, उस्मान बिन माजून, हासन, इब्राहिम बिन आदम, उजाइल बिन इयाल असे सूफी संत आठव्या–नवव्या शतकातच होऊन गेले. नवव्या शतकात निरनिराळ्या धर्माच्या परिषदांमधील चर्चांचा परिणाम सूफी संतांवर झाला. ते कर्मकांडाकडून ध्यानमार्गाकडे वळले. या सूफींमध्ये मासफूलकररवी, अबूसुलेमानुददारानी, जुन्नून मिस्त्री, लोजिदुल्लबिस्तानी उर्फ बयाजीत हे प्रमुख सूफी होते. त्या काळात कट्टर धर्माचार्य द्वैतवादी होते आणि मन्सूर हा संत अद्वैताचा पुरस्कर्ता होता. म्हणून मन्सूरला त्यांनी काफीर ठरविले व वधदंडाची शिक्षा दिली. मात्र पुढे गजाली हा शिक्षित असल्यामुळे त्याच्या काळापासून परिस्थिती बदलत गेली. त्याने मुस्लीम धर्माचारांवर अनेक ग्रंथ लिहिले. पुढे अरबी, जिल्ली हे सूफी साहित्यकार झाले. त्यांनी समाजाला वेगळी दीक्षा दिली.

सूफी संप्रदायातही मधुराभक्ती आढळते; परंतु भक्त हा प्रियकर आणि प्रेयसी परमेश्वर असे नाते त्यात असते. सूफीदर्शन हे इस्लामचे आध्यात्मिक वैभव आहे. अंत:शुद्धता अंतर्मुखता, ईश्वरमिलनासाठी उत्पन्न झालेली अनावर व्याकुळता ही सूफी भक्तीची खूण आहे.

सांप्रदायिक वृत्तीच्या कट्टर मुसलमानांनी ईश्वराचे सच्चे भक्त असलेल्या सूफींचा निर्दय छळ केला आहे. या बाबतीत त्यांच्यामध्ये व महाराष्ट्रातील संतांच्या कर्मठांकडून झालेल्या छळामध्ये साम्य दिसते. भारतात प्रवेशिल्यानंतर सूफी धर्माने बाराव्या शतकात चिश्ती संप्रदाय, तेराव्या शतकात सुहरावर्दी संप्रदाय, पंधराव्या शतकात कादरी संप्रदाय, सोळाव्या शतकात नक्शबंदी संप्रदाय अशा चार भिन्न नावांच्या आश्रयाने काम केले.

पंधरा ते सतराव्या शतकादरम्यान अनेक मुसलमानी साधू हिंदू संतांचे शिष्य झाले आणि त्यांनी आपल्या रचना मराठी भाषेत निर्माण केल्या. मृत्युंजय, हुसेन अंबर खान, अलमखान, शेख सुलतान, शेख दाजी, शेख महंमद, शहामुनी, वाजीद पठाण अशा कितीतरी मुसलमान संतांनी मराठी भाषेत रचना केलेल्या आढळतात.

शाह मुंतोजी ब्रम्हणी या बेदरच्या माणसास पंढरीच्या विठ्ठलाची ओढ लागली होती. सहजानंदांकडून उपदेशप्राप्तीनंतर त्यांचे नाव 'मृत्युंजय' असे झाले. कल्याणीजवळ नारायणपूर येथे राहून साधना करताना अनेक लिंगायत लोक त्यांच्या शिष्यपरिवारात सामील झाले. सहजानंद स्वामींना

त्यांनी 'ज्ञानसागरानंद' हा किताब दिला. त्यांनी 'स्वरूपसमाधान' व 'प्रकाशदीप' हे दोन लहान ग्रंथ, 'सिद्धसंकेत' नावाचे एक प्रकरण लिहिले. याशिवाय 'अनुभवसार', 'गुरुलीला', 'अमृतसार', 'अद्वैतप्रकाश', 'सीताबोध', 'पंचीकरण', 'विवेकोत्पत्ती', 'अनुभवामृत', अनेक पदे व अभंग शाह मुंतोजी ब्रम्हणी यांनी रचले.

हुसेन अंबर खान यांनी 'अंबर हुसेनी' (इ.स. १६५३) या नावाने भगवद्‌गीतेवर मराठीत ओवीबद्ध टीका केली. 'गीताभावार्थदीपिका' ह्या नावाने त्यांनी आपल्या टीकेचा उल्लेख केलेला असून त्यात ओव्यांची संख्या ८७१ आहे.

अलमखान हा आणखी एक मुसलमान भक्त कवी वडवाळच्या नागनाथ परंपरेतला म्हणून प्रसिद्ध आहे. याव्यतिरिक्त शहानवरंग, नागेश संप्रदायातील जंगली फकीर, सय्यद हुसेन, शाह हुसेन फकीर, सय्यद मोहम्मद, शेख सलीम मोहम्मद, रामभक्त लतीफ शाह या मुसलमान कवींनीही मराठी रचना केल्या आहेत.

सूफी संप्रदायाच्या कार्याचा आणि वाङ्मयनिर्मितीचा आढावा घेताना महत्त्वाची गोष्ट लक्षात येते ती अशी की, 'धर्माने मुसलमान राहूनही ते मराठी संस्कृतीशी एकरूप झाले. ह्याचे ठळक गमक म्हणजे त्यांच्यापैकी काहींनी पंढरपूरच्या विठ्ठलाला आपले श्रद्धास्थान मानले हे होय.'[७] इथली संस्कृती, रीतिरिवाज आणि भाषा आत्मसात करून मराठी भाषेचा अभिमान धरून अद्वैत तत्त्वज्ञान मांडणारी रचना हे सूफी संप्रदायाचे वैशिष्ट्य आहे.

## चैतन्य संप्रदाय

चैतन्य महाप्रभूंच्या कृष्णभक्तीला अनुसरून चैतन्य संप्रदायाची स्थापना झाली. चैतन्य महाप्रभूंनी आपल्या मताच्या समर्थनार्थ कोणत्याही ग्रंथावर कोणतेही भाष्य लिहिले नाही. श्रीकृष्णाच्या मधुराभक्तीत प्रभू इतके भावोन्मत्त असत की असा एखादा ग्रंथ लिहिणे, ही गोष्ट अशक्यप्राय होती. अशा या गौरांग चैतन्य महाप्रभूंनी (इ.स. १४८५ ते १५३३) कुठल्याही स्वतंत्र संप्रदायाची स्थापना व प्रचार करण्याचा आग्रह धरला नव्हता. तसा त्यांचा हेतूही नव्हता. तरी प्रत्यक्षात त्यांचे अनेक अनुयायी होते.

मूळ नाव विश्वंभर असलेल्या ह्या प्रभूंच्या जन्मानंतर 'हा कोणीतरी श्रेष्ठ पुरुष होईल' अशी भविष्यवाणी करण्यात आली होती. ही भविष्यवाणी पुढे खरी ठरली. केशवभारती नामक माध्वपंथी संन्याशाकडून त्यांनी

संन्यासदीक्षा घेतली. केशवप्रभूंनी त्यांचे नाव श्रीकृष्ण चैतन्य असे ठेवले. पुढे ते चैतन्यप्रभू म्हणून ओळखले गेले.

चैतन्य संप्रदाय हा वैष्णव संप्रदायाचा उपसंप्रदाय असेही म्हटले जाते. त्यांचे तत्त्वज्ञान भक्तिप्रधान आहे. श्रीकृष्ण हे मूळ तत्त्व असून त्याच्या ठिकाणी अनंत शक्ती राहतात. तो सर्वशक्तिमान आहे. त्याच्या शक्तीमुळेच जीवात्म्यांना आणि भौतिक जगताला अस्तित्व आहे. 'चैतन्यांच्या मते जीवतत्त्व शक्ती असून कृष्णतत्त्व हे शक्तिमत आहे. वैष्णव हा कृष्णाचे म्हणजे ईश्वराचे आकलन करू शकतो; पण त्याचे वर्णन करू शकत नाही. जीव हा अनेक फेऱ्यांतून शेवटी मुक्त होतो आणि गोलोकांत जातो. तो मुक्त झाल्यावरही गोलोकांत स्वत:चे वेगळेपण राखून ईश्वराच्या आनंदाचा उपभोग घेतो. कारण मुक्तीनंतरही जीव स्वयंचित्त म्हणून असतोच. त्याचे 'अप्राकृत अहंत्व' नंतरही कायमच राहते.'[८]

चैतन्य संप्रदायातील आचारविधी याचे विवेचन गोपालभट्ट ह्यांच्या 'हरिभक्तविलास' ह्या संस्कृत ग्रंथात आढळतात. तीन पदरी तुलसीमाला, गळ्याशी घट्ट बांधावी, पांढरी कफनी परिधान करणे, कपाळावर दोन उभ्या रेषांचे पांढरे गंध लावणे अशी ह्यांची काही वैशिष्ट्ये आहेत. अनुयायांच्या नावापुढे 'दास' किंवा 'दासी' हे पद लावले जाते. त्यांच्या बारा उपशाखा व चौसष्ट संघटन केंद्रे असून त्यांना 'परिवार' असे म्हणतात.

रामनवमी, नृसिंहजयंती, जन्माष्टमी, वामनद्वादशी हे चार वार्षिक उत्सव साजरे केले जातात. मूळ वैष्णव असूनही ते शिवरात्रीचा उपवास करतात. चैतन्य संप्रदाय हा भक्तिसंप्रदाय आहे. ह्या संप्रदायामार्फत काही पाठशाळा व गोशाळा चालविल्या जातात. मोफत आयुर्वेदिक औषधोपचार केंद्रे चालविली जातात. ह्या संप्रदायाच्या अनुयायांनी विशुद्ध भक्ती, शुद्ध आचरण, त्यागमय जीवन याद्वारे जनमानसावर प्रभाव पाडला. अनेकांना आपल्या पंथाकडे आकृष्ट केले. सर्व जातीच्या लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला.

चैतन्य संप्रदायातील महत्त्वाचे संत व कवी म्हणजे नित्यानंद (इ.स. १४७३), अद्वैताचार्य (इ.स. १४३४ – १५५७), कृष्णदास कविराज, लोचनदास, दामोदर पंडित, गदाधर पंडित (इ.स. १४८६ – १५१४), हरिदास ठाकूर (– –इ.स. १५३४), जगदानंद, मुरारीगुप्त, रामानंदराय, श्रीवास, सनातन गोस्वामी, जीवगोस्वामी, रूपगोस्वामी हे होत.

ह्या संप्रदायाचे प्रमुख कार्य ओरिसा, पश्चिम बंगाल अशा पूर्व प्रांतातच झाल्याचे दिसून येते. त्याचा प्रभाव बंगाली, उडिया, असमिया व हिंदी साहित्यावरच अधिक पडला आहे.

## वीरशैव संप्रदाय

प्राचीनतम 'वीरशैव संप्रदाय' वैदिक असूनही लिंगपूजक आहे. श्रीबसवेश्वर हे या संप्रदायाचे संस्थापक नसले तरी त्यांनी बाराव्या शतकात ह्या संप्रदायात चैतन्य ओतले. त्यांनी सामाजिक क्रांती आणि भक्तीची जोड ह्या संप्रदायाला दिली. शिवानुभव मंटपातून श्रीप्रभूदेव, श्रीबसवेश्वर, श्रीचन्नबसवेश्वर ह्यांच्यासारख्या अधिकारी आत्मानुभवी तत्त्वचिंतकाच्या मांडीला मांडी लावून विविध जातीजमातींची माणसे उच्चनीच भेदभाव विसरून धर्मचर्चा करू लागली. अक्कमहादेवी, अक्कनागम्मा, निलम्मा, गंगाम्बिका, राणी महादेवी अशा स्त्रियाही धर्मचर्चेत तन्मयतेने सहभागी झाल्या. काहींच्या मते, वीरशैव संप्रदायाची निर्मिती ही वैदिक धर्माच्या उत्पत्तीबरोबरच झाली; पण याचा सबळ पुरावा नाही. वीरशैव पंथाचा उगम 'वीरबाणांजू' ह्या संप्रदायातून झाला आहे. पाचशे स्वामींनी 'ऐहोळे' या गावी पंथाची स्थापना केली. हे स्वामी शैवपंथी असले तरी ते स्वतंत्र विचारांचे होते. ज्या नवीन पंथामध्ये ते सामील झाले, त्या पंथाचा उगम 'अठलूर' या गावी रामय्याच्या प्रेरणेने झाला, असेही मत मांडले जाते.

रामय्या हे जर वीरशैव संप्रदायाचे संस्थापक असतील तर बसवेश्वर हे सुधारक आहेत. बसवेश्वरांनी शैवपंथातील विकृती दूर करून शिवभक्तीकडे लोकांना आकर्षित केले. बसवेश्वरांप्रमाणेच अल्लमप्रभू यांनाही या पंथाचे अध्वर्यू मानले गेले. ईश्वरभक्तीतील श्रीमंतांची मक्तेदारी नष्ट करून सामान्यांपर्यंत, स्त्रियांपर्यंत हे अधिकार पोचविण्याचे कार्य त्यांनी केले. ह्या पंथातील शिष्यांना शिवचरण म्हटले जाते. वेळोवेळी हे शिवचरण एकत्र येऊन विविध विषयांवर विचारविनिमय करीत आणि त्यांतून निर्माण झालेले ते वचनसाहित्य होय.

वीरशैव संप्रदायाने जे नवीन सिद्धांत मांडले, त्यांत वर्णाश्रमाचे खंडन, भेदभाव निर्मूलन, अग्नी व मूर्तिपूजेचा निषेध, पंचसुतके न मानणे, प्राणीहिंसा न करता शाकाहार सेवन करणे, एकेश्वर मानणे, शरीरावर शिवलिंग धारण करणे व शिवभक्ती करणे आणि शरीरश्रमांना प्रतिष्ठा देणे ह्यांचा समावेश होतो.

विश्वनाथकृत ‘ब्रम्हांडपुराण’ ही चौदाव्या शतकातील पहिली मराठी वीरशैव वाङ्मयकृती. ही काव्यस्वरूपातील रचना आहे. विश्वनाथांप्रमाणेच शिवलिंग, रामलिंग, रेवणसिद्ध, भोजलिंग, शांतिलिंग ह्यांनीही पंधरा ते सतराव्या शतकादरम्यान रचना केल्या आहेत. शांतिलिंगांनी इ.स. १६०४ च्या सुमारास ‘विवेकचिंतामणी’ हा परमार्थविषयक व अन्य लौकिकशास्त्रविषयक माहितीचा ग्रंथ रचला. त्यांनी कर्णहस्तकी व शांतबोध हे ग्रंथही रचले.

वीरशैव संप्रदायातील एक प्रभावशाली व्यक्ती म्हणून मन्मथस्वामींचे नाव घेतले जाते. मन्मथस्वामींनी ‘परमरहस्य’, ‘मन्मथगाथा’, ‘ज्ञानबोध’, ‘अनुभवानंद’, ‘स्वयंप्रकाश’ इत्यादी ग्रंथ रचले. मन्मथशिष्य लिंगेश्वर, लिंगेश्वराचा पुत्र बसवलिंग, महादेव, लक्ष्मण, शिवदास, सत्यात्मज हे सतराव्या शतकापर्यंत झालेले वीरशैव संप्रदायातील काही कवी.

वीरशैवांचा शक्तिविशिष्टाद्वैतसिद्धांत कर्मप्रधान आहे. सर्वशक्तिमान परमेश्वर ‘शिव’ हाच मानून तो प्रत्येकाच्या शरीरात वास करतो. त्याची पूजा करावी; परंतु अवडंबर माजवू नये. देवाला नैवेद्य किंवा बळी देऊ नये. भव्य मंदिरे बांधू नयेत. थाटामाटाचे उत्सव करू नयेत, अशी समाजसुधारणात्मक मते वीरशैव संप्रदायाची आढळतात.

## ख्रिस्ती संप्रदाय

भारतातील आणि विशेषत: मराठी प्रांतातील ख्रिस्ती संप्रदायाचा विचार करताना लक्षात येते की, पोर्तुगिजांनी पश्चिम किनाऱ्यावरील मोक्याची बंदरे काबीज करत इ.स. १५१० मध्ये गोवे ताब्यात घेतले. डोमिनिकन पाद्रींचे तेथे आगमन झाले. फ्रान्सिकन वगैरे इतर पंथाचे पाद्रीही तेथे धर्मप्रसारार्थ येऊन पोचले. पुढे ब्रिटिशांचे आगमन झाले आणि ख्रिस्ती धर्मप्रसारकांची संख्या वाढतच गेली. फादर स्टीफन्ससारख्या धर्मप्रसारकांनी येशू ख्रिस्त, सेंट पीटर, सेंट अँथनी या ख्रिस्ती संतांवर मराठीतून पौराणिक रचना केली. फादर स्टीफन्स यांनी ‘कोंकणीचे व्याकरण’ पोर्तुगीजमध्ये, ‘धर्मतत्त्वपुस्तिका’ कोंकणीत तर ‘ख्रिस्तपुराण’ हा ग्रंथ मराठीत लिहिला. गोव्यातील कवी ज्ञानेश्वर, एकनाथांच्या रचनांचा वारसा चालवीत होते. त्याच सुमारास फादर स्टीफन्सचे आगमन झाले होते. फादर स्टीफन्स यांनी देवनागरी लिपीचा अभ्यास केला. मराठी शिकले आणि ‘बायबल’ ह्या पवित्र धर्मग्रंथावर आधारित ‘ख्रिस्तपुराण’ निर्माण केले. हा ग्रंथ इ.स. १६१४ मध्ये रचला गेला.

एतियेत–द–ला क्रुवाँ हा फ्रेंच जेझुइट धर्मप्रचारक इ.स. १६०२ मध्ये गोव्यात आला आणि त्याने कोंकणी व मराठीचा अभ्यास करून 'पीटर पुराण' हा सुमारे १५००० ओव्यांचा ग्रंथ रचला.

ख्रिस्ताच्या दारुण अंतावर आणि मेरीच्या करुण विलापावर तीन विलापिका मराठीत प्रसिद्ध आहेत : 'ख्रिस्ताचे वधस्तंभारोहण', 'ख्रिस्ताचे यातनागीत', 'ख्रिस्ताच्या वधस्तंभारोहणाप्रसंगीचे विलाप'. यांपैकी पहिली रचना क्रुवाँची असावी. दुसरी रचना पाद्री मानुऐल जॉकीस द नोरोंज यांची तर तिसरी विलापिका कोण्या चरणसेवक या कर्त्याने रचली आहे.

आंतुनियु–द सालंदाज (इ.स. १५९८ ते १६६३) या जेझुएट संतचरित्रकाराने सांतु आतुनीची जीवित्वकथा रचली. याशिवाय 'जीवित्ववृक्षाची फळे' हा गोव्याच्या बोलीत रचलेला ग्रंथही त्यांच्या नावावर आहे.

पाद्री अलमैद, पेद्रोज इत्यादी मंडळींनीही ख्रिस्ती मराठी वाङ्मयात भर टाकली. या सर्वांचा विचार करताना मराठी सरस्वतीच्या दरबारातील एक श्रेष्ठ विलायती मानकरी म्हणून फादर स्टीफन्स यांना मान द्यावा लागतो.

## वारकरी संप्रदाय

महाराष्ट्रातील फार महत्त्वाचा भक्तिसंप्रदाय म्हणून वारकरी संप्रदायाचे नाव घ्यावे लागेल. महाराष्ट्रातील आबालवृद्धांच्या, स्त्रीपुरुषांच्या, नागरी–खेडुतांच्या सर्वतऱ्हेच्या व्यक्तिसमूहांच्या हृदयांची पकड घेणारा असा हा पंथ आहे. इतक्या व्यापक प्रमाणात जनमानसाची पकड घेण्यामागे या पंथाने सर्व मानवांना आपल्या औदार्याने व वात्सल्याने पोटाशी धरून भक्तीच्या राजमार्गाचे हितगुज सर्वांना मोकळेपणाने सांगितले, हेच कारण आहे, असे म्हटले तरी चालेल.

या संप्रदायास वारकरी, माळकरी अथवा भागवत पंथ म्हणतात. वारकरी म्हणजे 'वारी करी'. वारी म्हणजे एखाद्या ठिकाणी नियमाने जाणे. वारकरी संप्रदायाचे आद्यपीठ जे पंढरपूर, त्याठिकाणी दरवर्षी नियमाने जाणारे ते वारकरी. या संप्रदायातील लोक पांडुरंगास प्रिय अशी तुळशीची माळ हा अलंकार आपले जीवन त्याला अर्पण केल्याची खूण म्हणून गळ्यात परिधान करतात. त्यामुळे ही माळ धारण करणारे ते माळकरी. तसेच भगवंताला आपले सर्वस्व अर्पण करणारा भक्त तो भागवत व हा पंथ भक्तिप्रधान असल्यामुळे भक्तांनी स्वीकारलेला मार्ग म्हणून यास भागवत पंथ असेही म्हटले जाते.

सर्वांना सामावून घेणारा संप्रदाय म्हणून वारकरी संप्रदाय ओळखला जातो. 'वारकरी परंपरेचा इतिहास हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक—सामाजिक उत्क्रांतीचा आरसा आहे आणि त्यात चोखोबांसारखा तेराव्या शतकातला दलित कवी आणि बहिणाबाईसारखी सतराव्या शतकातील ब्राम्हण कवयित्री हे महत्त्वाचे मैलाचे दगड आहेत. या व्यक्तिमत्त्वांच्या आरशातच मराठी संस्कृतीने निर्माण केलेले संतत्व आणि कवित्वाचे मूलभूत समीकरण कळून येते.'[९]

वारकरी संप्रदायाच्या इतिहासाचे स्थूलमानाने पाच खंड पडतात.
१. पुंडलिक ते ज्ञानदेव, २. ज्ञानदेव—नामदेवांचा काळ, ३. भानुदास—एकनाथांचा काळ, ४. तुकाराम—निळोबारायांचा काळ व ५. तद्नंतरचा सुमारे २२५ वर्षांचा काळ.

वारकरी संप्रदायाचा उगम पुंडलिक ह्या श्रेष्ठ भगवद्‌भक्तापासून झाला आहे. पुंडलिकाच्या भक्तीवर लुब्ध होऊन द्वारकाधीश श्रीकृष्ण हे पंढरीस आले व विटेवर उभे राहिले अशी परंपरागत कथा आहे. 'पुंडलिकाच्या भावार्था । गोकुळाहुनी जाला येता । निजप्रेम भक्तिभक्ता । घ्या घ्या आता म्हणतसे ।।' या 'श्रीज्ञानदेव सकलसंतगाथे'तील उल्लेखावरून विठ्ठलमूर्तीची स्थापना पुंडलिकाच्या हातून झाल्याचे स्पष्ट होते.

संप्रदायातील महत्त्वाच्या व्यक्ती :

१. निवृत्तिनाथ (इ.स. १२७३ – १२९७)
२. ज्ञानेश्वर (इ.स. १२७५ – १२९६)
३. नामदेव (इ.स. १२७० – १३५०)
४. एकनाथ (इ.स. १५३३ – १५९९)
५. तुकाराम (इ.स. १६०८ – १६४९)

वारकरी संप्रदायात परंपरागत चालत आलेल्या समजुतीप्रमाणे मानवी जीवनाचे ध्येय मोक्ष हे न मानता भक्ती हे मानलेले आहे. वारकरी संप्रदायाची मुख्य कामगिरी धार्मिक स्वरूपाची व पर्यायाने सामाजिक व राजकीय परिस्थितीस उन्नतीकडे नेण्यास कारणीभूत ठरली. वारकरी संतांनी प्रतिबंधक समजुती व आचार यांचा एका बाजूने विध्वंस केला व दुसऱ्या बाजूने धर्माचा योग्य बोध देऊन सरळ, साधी पण जीवनास अत्यंत कल्याणकारी अशी संप्रदाय परंपरा निर्माण केली. राष्ट्राची बंधुप्रीती वाढवून एकजूटता कायम राखण्यास लोकांना शिकविले. इतर धार्मिक आचारांत स्वत:ला गुंतवण्यापेक्षा ईश्वरावर श्रद्धा व विश्वास ठेवून त्याचे भजन करण्यास प्रोत्साहन दिले.

तुकोबांसारख्या संतांनी समाजातील सर्व थरांमध्ये धार्मिक भावना जागृत करून शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेची वैचारिक पार्श्वभूमी तयार केली.

परंपरागत चालत आलेली वर्णाश्रमधर्माची चौकट या संप्रदायाने मोडून टाकली. मनुष्याचे ध्येय मोक्ष नसून भक्ती आहे व ती करण्याचा अधिकार स्त्रीशूद्रचांडाळादी कोणालाही आहे. म्हणूनच वारकरी संप्रदायात अनेक जातीधर्माची संतावळी दिसून येते. जसे चोखामेळा महार, नामदेव शिंपी, नरहरी सोनार, सावता माळी, गोरोबा कुंभार, वेश्यापुत्री कान्होपात्रा, सेना न्हावी इत्यादी. संसार सोडायचा नाही व त्यातच सर्वस्वी बुडायचे नाही तर ईशस्तवनात अनासक्तीने सर्व व्यवहार करावयाचे, हे सूत्र संतांनी शिकविले. मनुष्याच्या थोरवीचा मानबिंदू वर्ण नाही तर परमेश्वरभक्ती आहे, ही गोष्ट त्यांनी ठासून सांगितली. वारकरी संप्रदायाची कामगिरी पाहता ती अनुपम्य अशी आहे. ज्ञानेश्वरांचे वाङ्मय रसिकतेचा परमोच्च बिंदू आहे. आशयाने, माधुर्याने, वाक्चातुर्याने, भक्तीने, ओज, प्रासाद या वाङ्मयीन गुणांनी परिपूर्ण अशी शब्दसृष्टी ज्ञानेश्वरांनी निर्माण केली व नामदेव, एकनाथ, तुकारामादी संतांनी त्याला अधिकच समृद्ध बनविले.

देवाबद्दल व धर्माबद्दल लोकांच्या वेडगळ समजुतींना दूर करण्याचे महत्त्वाचे कार्य संतांनी केले. व्रते, वैकल्ये, क्षुद्र देवतांच्या पूजा, अघोरी व हिंसात्मक यज्ञयाग वगैरे प्रकार बंद केले. त्यावर कसून टीका करून संतांनी समाजाला भक्तिमार्गाकडे वळविले.

महाराष्ट्रात अन्य काही संप्रदायही अस्तित्वात होते. त्यामध्ये बौद्ध संप्रदाय, शाक्त संप्रदाय, कापालिक संप्रदाय, श्रावक संप्रदाय, वेदांती संप्रदाय इत्यादींचा समावेश होतो.

## समारोप

संत साहित्य निर्माण करणारे कितीतरी संप्रदाय आणि त्यातून निर्माण झालेले उपसंप्रदाय आणि पंथ प्राचीन काळापासून आढळतात. या संप्रदायांची निर्मिती वेगवेगळ्या कारणांनी जरी झाली असली तरी त्याला धर्माचे अधिष्ठान होते. बहुतेक संप्रदायांमध्ये भक्तीची जोड दिली गेली. अनेक बंधनांमध्ये, व्रतवैकल्यांमध्ये, पुरातन रूढी–परंपरांमध्ये अडकलेल्या समाजाला बाहेर काढण्याचे कार्य बऱ्याच संप्रदायांनी केले. निवडक संप्रदायांमधील कर्मठपणा सोडला तर उदारमतवादाची बीजे या पंथसंप्रदायांच्या विचारांमध्ये रुजलेली

दिसतात. वर्णाश्रमविरोधी, जातिप्रथेविरोधी कार्य या संप्रदायांनी केले. स्त्रियांना, शूद्रांना बहुजन समाजाला एकत्र आणले. त्यांचे अधिकार मिळवून दिले. समानता आणण्याचा प्रयत्न केला.

वारकरी संप्रदाय, नाथ संप्रदाय, दत्त संप्रदाय, महानुभाव पंथ, समर्थ संप्रदाय या पाच संप्रदायांनी महाराष्ट्रावर दीर्घकाळ अधिराज्य केलेले आहे. दत्त संप्रदाय व समर्थ संप्रदायांनी वर्णाश्रमधर्माची कर्मठता कमी न केल्याने त्यांना जनमानसाची पकड घेता आली नाही. कर्मठपणा, सोवळेओवळे, विधिनिषेध यांमुळे ब्राम्हणवर्ग वगळता इतर समाजांमध्ये दत्त संप्रदाय लोकप्रिय झाला नाही. समर्थ संप्रदायात महंतांच्या नातवाइकांनाच मठाची गादी मिळणे व गादीसाठी त्यांच्यात भांडणे सुरू राहिल्याने कर्तृत्ववान व्यक्ती गादीवर बसण्याची शक्यता कमीच होत गेली. रामदासांनी ब्राम्हण हाच गुरू असावा असे प्रतिपादिले. शंकराचार्यांचीच मोक्षप्राप्तीची कल्पना मांडली. कदाचित अशा कारणांनीच प्रा. गं.बा. सरदारांनी ह्या दोन संप्रदायांना 'प्रतिगामी' संबोधले आहे.

नाथ संप्रदायाने योगमार्गाचा पुरस्कार केल्याने हा मार्ग लोकांना आचरणे कठीण झाले. योगमार्गाच्या नावाखाली बैरागी वृत्ती वाढली. महानुभाव द्वैती असल्याने त्याचे तत्त्वज्ञान अपूर्ण आहे. आचाराच्या बाबतीत त्यांनी ज्ञानापेक्षा प्रेमाचा मार्ग सुलभ मानला असला तरी त्यागप्रवृत्तीचा अतिरेक केला आणि अनाचारास वाव मिळाला. 'तत्त्वज्ञानाची गुंतागुंत, आचारधर्मातील आत्मक्लेश, आचारधर्म हेच एक कर्मकांड, सांप्रदायिकतेचा वाढता प्रभाव आणि समाजापासून दूर जाण्याची वृत्ती यांमुळे सुलभ, प्रवाही, गतिशील, जीवनसन्मुख, समन्वयवादी अशा ज्ञानदेवांच्या वारकरी पंथापुढे महानुभव पंथ बळ धरू शकला नाही.'[१०]

ज्ञानेश्वरांपासून रामदासांपर्यंत सर्व संतांच्या वाङ्मयातून वैराग्याचे बोल उमटले आहेत; परंतु भागवतधर्मी संतांची शिकवण रामदासादी संतांहून काहीशी भिन्न होती. भागवत संप्रदायातील संतांनी संन्यासाची अवास्तव शिकवण दिली नाही. संन्यासाचा पुरस्कार करून आश्रम, मठ स्थापन केले नाही. पंथप्रसाराची खटपटही केली नाही. रामदासांनी जरी प्रपंचविज्ञान, प्रपंचबोध, सावधानता सांगितली असली, तरी आदर्श दिला तो स्वतः आचरलेल्या संन्यासमार्गाचा. दत्तसंप्रदायात कडक सोवळेओवळे होते. महानुभाव पंथात स्त्रियांनाही संन्यास घेण्याची मुभा ठेवली. दक्षिणेकडे जैन धर्मीयांत संन्यासमार्गाचे प्राबल्य होतेच. महाराष्ट्रात भागवत धर्मीय संतांनी व कर्नाटकात लिंगायतांनी संन्यासमार्गास पायबंध घातला.

भक्तिमार्ग व संन्यासमार्ग जरी एकाच समाजात निर्माण होत असले, तरी त्यामध्ये तात्त्विकदृष्ट्या मोठा फरक आहे. भक्तिमार्गाने कधीही संसार सोडून रानावनात जाण्याचा उपदेश केला नाही; तर उलट प्रपंच सांभाळून भक्ती करा, असेच सांगितले. तसेच धर्मजागृतीबरोबरच धर्मसुधारणा केल्यामुळे सर्व जनतेची धार्मिक अधिष्ठानाची पातळी उंचावली. समाजधारणेला आवश्यक असणाऱ्या जीवनमूल्यांचे संरक्षण नि संवर्धन केले. 'महत्त्वाची गोष्ट जर ज्ञानेश्वरादी संतांनी केली असेल, तर ती विषमतेने कोंडलेल्या समाजात समतेची हवा आणली. संतांनी प्रतिपादिलेल्या या भागवतधर्माने हवा शुद्ध करण्याचे (व्हेंटिलेटरचे) काम केले, असे म्हटले पाहिजे. हा ब्राम्हण, तो शूद्र, तो अस्पृश्य असा भेदभाव दैनंदिन जीवनात सारखा केला जात होता. तो नाहीसा करण्याचा कठीण उद्योग त्यांनी आरंभिला. देवाचे दरबारात सर्वजण सारखे आहेत. तेथे जातिभेद वगैरे काही एक नाही, अशी खालच्या वर्गातील लोकांची खात्री पटवली.'[११]

संतचळवळीत वारकरी संप्रदाय सर्वाधिक लोकप्रिय आणि दीर्घकाळ टिकलेला संप्रदाय आहे. जातिभेदाला वाव न ठेवता समतेची शिकवण त्यांनी दिली. स्त्रीपुरुषांना समान संधी दिली. हीनप्रतीच्या क्षुद्र देवीदेवतांच्या जंजाळातून जनतेला मुक्त करून एकमेव विठ्ठलाच्या चरणी त्यांना आणले. कर्मकांडाला थारा दिला नाही. मानवांत देवतांचा अंश पाहण्याची थोर शिकवण वारकरी संप्रदायाने दिली. या संप्रदायाने दलितोद्धाराचेही कार्य केले, प्रेरणा दिली. बहुजन समाजाच्या मनामधील प्रयत्नवाद व प्रारब्धवाद यांतील अंतर कमी केले. 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' असे जरी प्रसंगानुरूप सांगितले असले तरी 'नराचा नारायण'ही होऊ शकतो असेही सांगितले आहे. सहज सोप्या नामस्मरणाचा भक्तिमार्ग मांडणाऱ्या वारकरी संप्रदायाला बहुजन समाजाने डोक्यावर घेतले, ते या कारणांमुळेच.

वारकरी संप्रदायाने दिलेले संत आणि त्यांचे साहित्य हे अत्युच्च दर्जाचे आणि सर्वसमावेशक असले तरी अन्य सर्वच पंथ, संप्रदायांनी, संतांनी आणि त्यांच्या अनुयायांनी जी साहित्यनिर्मिती केली, ती संत साहित्य म्हणूनच गणली जाते आणि महाराष्ट्राच्या इतिहासात या व्यापक अशा ऐतिहासिक चळवळीला तोड नाही.

'संत साहित्य' या ग्रंथनिर्मितीच्या निमित्ताने संत चळवळ आणि विविध पंथ, संप्रदायांचा इतिहास अभ्यासणे क्रमप्राप्त आहे आणि तेवढ्यासाठीच हा लेखप्रपंच!

## संदर्भ

१. राजवाडे, वि.का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, प्रस्तावना खंड, पृ. ४६–४७.

— दा.बा. भिंगारकर, 'पार्श्वभूमी', संत कवयित्री जनाबाई : चरित्र, काव्य आणि कामगिरी, प्रथमावृत्ती, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. १० वरून उद्धृत.

२. पेंडसे, शं.दा., 'प्रास्ताविक', भागवतोत्तम संत एकनाथ, द्वितीयावृत्ती, काँटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८२, पृ. ५.

३. भिंगारकर, दा.बा., 'पार्श्वभूमी', संत कवयित्री जनाबाई : चरित्र, काव्य आणि कामगिरी, उनि., पृ. ११.

४. मोकाशी, पं.रा., 'महानुभावपंथ', महाराष्ट्रातील पाच संप्रदाय, द्वितीयावृत्ती, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९७५, पृ. ३८.

५. जोशी, पं. महादेवशास्त्री (संपा.), 'दत्त संप्रदाय', भारतीय संस्कृतिकोश, खंड चौथा, प्रथमावृत्ती, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९६७, पृ. २७६.

६. जोशी, पं. महादेवशास्त्री (संपा.), 'रामदासी संप्रदाय', भारतीय संस्कृतिकोश, खंड आठवा, प्रथमावृत्ती, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९७४, पृ. १६२–१६३.

७. मोरजे, गं.ना., 'अन्यपंथीय रचना : शाहिरी व गद्य', मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा, भाग पहिला, संपा. स.गं. मालशे, प्रथमावृत्ती, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८२, पृ. ६१६.

८. जोशी, लक्ष्मणशास्त्री (संपा.), 'चैतन्य संप्रदाय', मराठी विश्वकोश, खंड सहावा, प्रथमावृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७७, पृ. १०.

९. चित्रे, दिलीप पुरुषोत्तम, बहेणी म्हणे हात घाला मस्तकी, प्रथमावृत्ती, भागवत प्रबोधन संस्था, देहू, १९९८, पृ. ६.

१०. देशमुख, उषा माधव, 'महानुभाव साहित्य', मराठी साहित्याचे आदिबंध, प्रथमावृत्ती, लोकवाङ्मय गृह प्रा.लि., मुंबई, १९८२, पृ. १५१.

११. मोकाशी, पं.रा., 'उपसंहार', महाराष्ट्रातील पाच संप्रदाय, उनि., पृ. २१०.

❖❖❖